दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDO ASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २०६ वा बुधवार दि.१७ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# पहिल्या राज्य क्रीडा दिनानिमित्त उदगीर येथे खेळाडूंचा क्रीडामंत्र्यांच्या हस्ते गौरव

# राज्याला क्रीडा क्षेत्रात अग्रेसर बनविण्यासाठी प्रयत्नशील - क्रीडा मंत्री संजय बनसोडे





लातूर, दि. १६ (जिमाका): ऑलिम्पिकमध्ये देशाला पाहिले वैयक्तिक पदक मिळवून देणारे कुस्तीपटू खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा होत आहे. यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा गौरव आणि स्मरण करून राज्यात विविध खेळाविषयी जनजागृती करण्याचा उद्देश आहे. यासोबतच राज्यात आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावेत, आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवर क्रीडा क्षेत्रात राज्य अग्रेसर बनावे, यासाठी क्रीडा विभागामार्फत प्रयत्न सुरू असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.पहिल्या राज्य क्रीडा दिनानिमित्त सोमवारी उदगीर येथील तालुका क्रीडा संकुल येथे आयोजित पुरस्कारप्राप्त खेळाडूंचा गौरव आणि मंत्री चषक राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेच्या उद्घानप्रसंगी ना. बनसोडे बोलत होते. माजी आमदार गोविंद केंद्रे, व्यंकटराव बेंद्रे, शिवछत्रपती जीवन गौरव पुरस्कार प्राप्त गणपतराव माने, पंडित धुमाळ, सिध्देश्वर पाटील, दत्ता पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, शेख फैयाज, अहेमद सरोवर, शेख इफ्तेखार यांच्यासह खेळाडू, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमी नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.राज्य शासनाने खेळाडूंसाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. गत तीन वर्षांपासून रखडलेल्या शिवछत्रपती राज्य पुरस्काराचे नुकतेच वितरण करण्यात आले आहे. शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार विजेत्या खेळाडूंना ३ लाख ऐवजी ५ लाख रुपये आणि अन्य पुरस्कार विजेत्यांना १ लाख ऐवजी ३ लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी, खेळाडूंना नवीन तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा आणि गुणवत्ता वाढीसाठी 'मिशन लक्ष्यवेध' योजनेंतर्गत प्रयत्न सुरू आहेत. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा, ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा या आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदक विजेत्या स्पर्धकांना देण्यात येणाऱ्या बक्षिसांच्या रक्कमेत भरघोस वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे ना. बनसोडे यांनी सांगितले.उदगीर येथे होणार खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा उदगीरला खेळाची मोठी आणि खूप जुनी परंपरा असून ही परंपरा जोपासण्यासाठी उदगीर येथे राज्याच्या क्रीडा विभागामार्फत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. नुकताच राज्यस्तरीय युवा महोत्सव शहरात पार पडला. तसेच विविध क्रीडा स्पर्धाही झाल्या. आता लवकरच खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा उदगीरमध्ये आयोजित केली जाणार असल्याचे क्रीडा मंत्री ना. संजय बनसोडे यांनी सांगितले.मंत्री चषक राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन राज्य क्रीडा दिनानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि उदगीर येथील नामदार संजय बनसोडे क्रीडा मंडळाच्या वतीने उदगीर तालुका क्रीडा संकुल येथे मंत्री चषक राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले.राज्य क्रीडा दिनानिमित्त आयोजित उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद राज्य क्रीडा दिनानिमित्त रुस्तम ए हिंद, ध्यानचंद पुरस्कार प्राप्त हरिश्चंद्र बिराजदार यांच्या निलंगा तालुक्यातील रामलिंग मुडगड येथील जन्मस्थळावरून उदगीर तालुका क्रीडा संकुल पर्यंत क्रीडा ज्योत आणण्यात आली. उदगीर तालुका क्रीडा संकुल येथे ही ज्योत क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.पहिल्या राज्य क्रीडा दिनानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत क्रीडा विषयक मार्गदर्शन शिबीर, क्रीडा विषयक जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारांची माहिती देण्यात आली. उदगीर शहरातील विद्यार्थ्यांचा या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी प्रास्ताविकात सांगितले.जिल्हा क्रीडा संकुल येथे 'खेलो इंडिया' अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंनी यावेळी दाखविलेल्या कुस्ती आणि जिमॅस्टिकच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची दाद मिळविली.शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त गणपतराव माने आणि दत्ता गलाले, राष्ट्रीय कबड्डी खेळाडू आकाश बनसोडे, आंतरराष्ट्रीय बेसबॉल खेळाडू ज्योती पवार, रायफल नेमबाज जागृती चंदनकेरे, थायबॉक्सिंग खेळाडू अबू सुलेमान यांच्यासह अन्य खेळाडूंचा यावेळी सन्मान करण्यात आला. माजी आमदार गोविंद केंद्रे, व्यंकटराव बेंद्रे, दत्ता पाटील, शेख फैयाज, अहेमद सरोवर यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा केंद्रे, संतोष कोले यांनी केले.

## संभाजी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ.अशोक काळम यांची निवड



मुरूड: येथील संभाजी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. अशोक काळम यांची निवड करण्यात आली असून दिनांक १३ जानेवारी २०२४ रोजी त्यांनी प्राचार्य पदाचा पदभार स्विकारला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.बी.एस.(दादा) पटाडे, संस्थेचे सचिव मा. ड. विजयजी पाटील तसेच संस्थेच्या पदाधकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. डॉ.अशोक काळम यांनी प्राचार्य पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचा संस्थेचे अध्यक्ष मा. बी.एस.(दादा) पटाडे यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, संभाजी महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसाठी आणि विद्यार्थी हितासाठी नेहमी प्रयत्नशील राहून सर्वांमध्ये समन्वय साधून पदाला न्याय देण्यासाठी कटिबद्ध राहीन. तसेच आपणा सर्वांच्या सहकार्यानेच हे सर्व शक्य आहे. असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. पी.एस.देशमुख, प्रा. डॉ. आर.एफ.अंबाड, प्रा. डॉ. ए.एस.कानडे, श्री सुनिल पटाडे, श्री.अशोक बुबणे, प्रा.पी.डी.चौधरी, प्रा.निलेश क्षीरसागर, श्री.बी.बी.देशमुख आदींनी उपस्थित राहुन अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जनकल्याणकारी दिवस चेंबूर येथील (बिएसपी) भवनात उत्साहात साजरा

ब्रह्मण मुंबई / चेंबूर (प्रतिनिधी) :– दिनांक :१५ जानेवारी २०२४ रोजी बहुजन समाज पार्टी च्या राष्ट्रीय अध्यक्षा बहन कुमारी मायावतीजी यांच्या ६८ व्या वाढदिवसा निम्मित 'जनकल्याणकारी दिवस' बीएसपी भवन चेंबूर, प्रदेश कार्यालय मुंबई येथे मुंबई अध्यक्ष प्रा. प्रविण धोत्रे यांच्या नेतृत्वाखाली जल्लोषात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक : महाराष्ट्रराज्याचे प्रदेश उपाध्यक्ष ड. संदीप ताजने यांनी उपस्थित पदाधिकारी कार्यकरते यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र प्रदेश महासचिव प्रशांत इंगळे, ( मुंबई झोन ) मुंबई अध्यक्ष प्रा. प्रवीण धोत्रे, रामसुमेर जैस्वार मुबई मुख्य संयोजक, मुंबई प्रभारी श्यामलाल जैस्वाल, सुरेश महाडिक, संतोष अडसूळ, पंकज जाधव, मिलरीपली प्रियदर्शी, ड. प्रणाली पाते, मुंबई उपाध्यक्ष शैलेश पवार, यांच्यासह उपस्थित सर्व जिल्हा अध्यक्षांनी बहन मायावतीजी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी महापुरुषोंके सन्मान मे बिएसपी मैदान मे, बहन मायावतीजी जिंदाबाद ! मा. आकाश आनंद जिंदाबाद !! च्या घोषणा यावेळी देऊन बहनजींचा जनकल्याणकारी दिवस जल्लोषात साजरा करण्यात आला. त्यावेळी शेकडोंच्या संख्येत पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## दाओस दौरा म्हणजे 'खोदा पहाड निकला चूहा'

मुंबई : दाओस येथे होणा–या जागतिक आर्थिक परिषदेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उद्योगमंत्री उदय सामंत तसेच उद्योग विभाग, एमआयडीसी, मुख्यमंत्री सचिवालयातील वरिष्ठ अधिका–यांचे शिष्टमंडळ जात आहे. यावरून आता विरोधकांनी सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. 'दाओस' दौरा म्हणजे 'खोदा पहाड़ निकला चूहा' असा होणार असल्याचे म्हणत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवारांनी सरकारवर टीका केली आहे.याबाबत बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, ''महाराष्ट्र पाहणार आहे की, 'खोदा पहाड़ निकला चूहा', मागच्या वेळी देखील असेच झाले होते. डोंगर खोदायला गेले आणि उंदीर घेऊन आले. ज्याची पाच कोटींची लिमिट नाही, त्याच्या नावावर हजारो कोटींची गुंतवणूक मागच्या वेळी केलेल्या दाओस दौ–यात दाखवली. ज्या विदेशी कंपन्या म्हणून दाखवल्या, त्या भारतीय कंपन्या निघाल्या. अशी बनवाबनवी आणि बोगसगिरी कशासाठी, महाराष्ट्रातील जनतेला मूर्ख समजून अशाप्रकारे हे सरकार वागत असेल आणि हे व–हाड घेऊन गेले असेल, सरकारच्या तिजोरीतील पैशांवर पर्यटन करत असतील तर हे महाराष्ट्राचे दुर्दैव असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.विशेष म्हणजे याबाबत वडेट्टीवार यांनी ट्वीट करत देखील सरकारवर निशाणा साधला आहे.''५० लोकांचा ताफा सोबतीला आणि त्यांचा ३४ कोटींचा खर्च करून राज्याचे मुख्यमंत्री दाओसला जात असल्याची माहिती पुढे आली आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या पैशाची उधळपट्टी करत तिथे राज्याच्या हिताची किती कामे होतील?, दौ–याचा एकूण खर्च बघता हा दाओस दौरा सरकारच्या मर्जीतील अधिकारी, नेते आणि त्यांच्या कुटुंबातील मंडळींच्या पर्यटनासाठी आहे

# किनवट माहूर तालुक्यात विकासकामे उद्घाटन, लोकार्पणाचा धूमधडाका ; पण कामाच्या दर्जाचं काय?

किनवट ता. प्र . /शेख शौकत :– दुरगामी विकासाभिमुख प्रबळ राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे नेहमीच विकासापासुन कोसो दूर असलेला दुर्गम आदिवासी बहुल किनवट माहूर विधानसभा मतदार संघ अशी ओळख आहे, भौगोलिकदृष्ट्या सुजलाम सुफलाम कृषी क्षेत्रासाठी पाण्याची मुबलकता असणाऱ्या या क्षेत्रात तत्कालीन आमदार स्व. किशनराव पाचपुते साहेब यांच्या व्यतिरीक्त कोणत्याही लोकप्रतिनीधी वा नेत्याने शेतक–यांना व्यवसायीकतेची जोड देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी किंवा बेरोजगार तरुणाच्या हाताला रोजगार मिळून आधिक सुबत्ता येईल असे महत्वकांक्षी प्रकल्प उभारण्यात कायमचं उदासीनता दिसून आलेली आहे. जिल्ह्याच्या ठिकाणापासुन जवळपास १५० किमी दूर अंतरावर असलेल्या किनवट तालुक्यासाठी हक्काचे असणारे आणि भविष्यात किनवट जिल्हा होईल यासाठी उभारण्यात येणारे अनेक शासकीय कार्यालये राजकीय दादागीरीने इतरत्र पळविल्याचे अनेक उदाहरणे आहेत. आमदार साहेब यांचा कोरोना सारख्या महामारी मध्ये दोन वर्षा पेक्षा जास्त कालावधी असाच गेला असतांना त्या नंतर च्या अत्यंत कमी कालावधीत आपली राजकीय प्रगल्भ मुत्सदीपणा दाखवुन महापुरुषांचे पुतळे, रस्ते, इमारती पुल, शासकीय दवाखाने अशा पायाभूत सुविधासाठी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र शासनाकडून निधी खेचून आणुन नव्या विकास पर्वाला सुरुवात केली. याचाच परीणाम जिकडे तिकडे विकास कामे चालु आहेत तर कुठे भूमीपूजन, तर कुठे लोकार्पण असा किनवट माहूर मतदार संघात पायाभूत सुवीधा कामाचा धड़ाका चालु आहे. आमदार साहेबांच्या प्रयत्नाने किनवट माहूर शहरी व ग्रामिण भागात विकासाची गंगा वाहत असतांना विकासकामाच्या दर्जा बाबत नागरीकांमध्ये तिव्र नापसंती दिसून येत आहे. विधानसभा क्षेत्रामध्ये झालेली किंवा चालू असलेली अनेक कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याने परीणामी बरेच रोड एक दोन महीन्यातच उखडून गेल्याने सदर रोड परीसरातील नागरीक सिमेंट धुळीने त्रस्त असल्याचे बघायला मिळत आहे. अधिकारी व प्रशासनावर जबरदस्त कमांड असलेल्या आमदारांच्या कार्यकाळात असे दर्जाहीन विकासकामे कसे काय होऊ शकतात हा सामान्य नागरीकांसह सर्वांनाच प्रश्न पडला आहे. सामान्य नागरीकाच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भरलेल्या कराच्या माध्यमातुन शासनाकडुन विकास कामासाठी निधी येत असतो. उदाहणार्थ १०० रूपयाचे मोबाईल रिचार्ज मारले तर १८ टक्के च्या हिशोबाने सामान्य नागरीक १०० ला १८ रूपये कर स्वरूपात शासनाला रक्कम भरत असतो या सर्व सामान्य नागरीकाने कर स्वरुपात शासनाकडे दिलेल्या पैशाचा योग्य विनोयोग होण्यासाठी संबंधीत यंत्रणांकडून गुणवत्तापूर्ण दर्जेदार कामे लोकप्रतिधी या नात्याने करुन घ्यावे अशी माफक अपेक्षा सुजान नागरीकांकडून होत आहे. विकास कामाच्या दर्जाच्या सांशकते सोबतच बहुतांश लोकांमध्ये परीसर निहाय असमान विकास कामे होत असल्याचा किंवा कुठल्या निकषावर विकासकामाचा प्राधान्यक्रम दिला जात आहे याबाबत सुध्दा नागरीकांमध्ये दबक्या आवाजात सांशकता व्यक्त केली जात आहे. याबाबत काही परीसर तूपाशी तर काही परीसर उपाशी असे म्हणण्याची वेळ आली आहे. याचे ज्वलंत उदाहरण खेड्यात सिमेंट रस्ते झालेली दयनिय अवस्था व उपेक्षित परीसर सांगता येईल. अती आवश्यक आहे त्या ठिकाणी व्यापक जनहित ध्यानात घेऊन विकास कामे करण्या ऐवजी कुणाच्या तरी घरासाठी रस्ता, कुणाच्या तरी शेत प्लॉटिंग वा उद्योगाकडे सुविधासाठी जाणारा रस्ता यालाच प्राधान्य दिल्या जात असल्याचे बोलले जात आहे. विधानसभा क्षेत्रातील किनवट–नांदेड महामार्गाच्या १६१ विलंबामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाचा पाढा वाचायचा झाल्यास याबाबत असे म्हणता येईल की माननीय नितीन गडकरी साहेबापर्यंत लोकप्रतिनिधीचाच आवाज पोहोचत नाही तर प्रसार माध्यमे व सामान्य नागरिकांचा आवाज काय पोहचणार अशी सुद्धा सर्वसामान्य नागरिकाची धारणा होऊन हतबल झालेले दिसत आहेत. किनवट माहूर विधानसभा क्षेत्रात इतक्या मोठ्या करोड़ों अरबों रुपयाचा विकास निधी आमदार साहेबानी महत्प्रयासाने खेचून आणला असता त्यामधुन दर्जेदार कामे झाले तरच सर्वसामान्य जनतेचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कराच्या स्वरुपातील पैसा सार्थकी लागला असे म्हणता येईल.



## संपादकीय....

# युद्ध संपता संपेना...

‘हमास’ने इस्त्राईलमध्ये दहशतवादी हल्ला केला, त्याला शंभर दिवस झाले आहेत. जगात दोन ठिकाणी युद्धे सुरू असून ती थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. उलट पश्चिम आशियात तर त्याची व्याप्ती वाढत आहे. असे का घडत असावे, हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांनाच नव्हे तर निरीक्षक आणि तज्ज्ञांनाही पडला आहे.अमेरिका आणि ब्रिटनच्या नौदलांनी लाल समुद्रामध्ये नुकताच येमेनच्या हौती बंडखोरांच्या ठिकाणांवर हवाई हल्ला केला. इराणचे पाठबळ असलेल्या या बंडखोरांच्या गटाकडून लाल समुद्रामधून प्रवास करणाऱ्या व्यापारी जहाजांवर वारंवार हल्ले केले जात आहेत, त्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिका आणि ब्रिटनने हे हवाई हल्ले केले. या हौथी नबंडखोरांचे ‘हमास’शी लागेबांधे आहेत.त्यामुळे इस्त्राईलने गाझापट्टीमध्ये ‘हमास’विरोधात सुरू केलेल्या कारवाईचा निषेध म्हणून लाल समुद्रात इस्त्राईलशी संबंधित जहाजांवर हल्ला करत असल्याचा दावा हौथी बंडखोरांनी केला आहे. त्याचप्रमाणे हौथी बंडखोर इस्त्राईलवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्लेही करत आहेत. तर दुसरीकडे ‘हमास’ आणि ‘हिजबुल्ला’ या दोन्ही दहशतवादी संघटनांच्या म्होरक्यांना इस्त्राईलचे लष्कर ठार करत आहे.या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर इस्त्राईल आणि ‘हमास’मध्ये सुरू झालेला हा संघर्ष प्रादेशिक संघर्षाचे स्वरूप धारण करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तर दुसरीकडे, सुमारे दोन वर्षांपासून सुरू असलेले युक्रेन–रशिया युद्ध नजीकच्या काळात तरी संपण्याची चिन्हे दिसत नाहीत.‘आधुनिक काळातील युद्ध ही अल्प कालावधीची असतील,’ असा सिद्धांत शीतयुद्धानंतर मांडण्यात आला होता. मात्र ही दोन्ही युद्धे या सिद्धांताला छेद देताना दिसताहेत. युद्धाबाबत विश्लेषण करणाऱ्या कोणत्याही तज्ज्ञांना, रशिया– युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर हे युद्ध दीर्घकाळ सुरू राहील याबाबत अंदाज लावता आला नव्हता. हीच गोष्ट इस्त्राईल–हमासमध्ये सुरू असलेल्या संघर्षाबाबतही लागू होते. इस्त्राईलकडून ‘हमास’वर करण्यात आलेले हवाई हल्ले आणि जमिनीवरून करण्यात आलेल्या लष्करी कारवाईनंतरसुद्धा, ओलीस ठेवलेल्या नागरिकांची सुटका करण्यासाठी ‘हमास’वर दबाव निर्माण करण्यात इस्त्राईलला यश आलेले नाही. जगातील सर्वश्रेष्ठ गुप्तचर संस्थांमध्ये अग्रस्थानी असलेल्या इस्त्राईलच्या गुप्तचर संस्थेलादेखील, ‘हमास’ने ओलीस ठेवलेले नागरिक नेमके कुठे आहेत, याचा ठावठिकाणा लावता आलेला नाही. विशेष म्हणजे गाझा पट्टीचा भाग भौगोलिकदृष्ट्या अत्यंत छोटा असूनदेखील हे ओलीस नेमके कोठे आहेत हे शोधता आ–लेले नाही. कोणतेही अधिकृत पाठबळ नसलेली ‘हमास’ ही दहशतवादी संघटना किती तयारीने या युद्धात उतरली आहे, हेच यावरून दिसते. सध्या, युद्धबंदी किंवा पॅलेस्टाईनला मान्यता यांसारख्या कोणत्याही सल्ल्यावर विचार करण्याची इस्त्राईलची मःनस्थिती नसल्याचे स्पष्ट झाले आहे. थोडक्यात, ही दोन्ही युद्धे लवकर थांबतील असे वाटत नाही.अरब राष्ट्रांमध्ये १९९१ मध्ये ‘ऑपरेशन डेझर्ट’ अंतर्गत कुवेतला स्वतंत्र करण्यासाठी इराकविरोधातील युद्ध पाच आठवडे सुरू राहिले. अमेरिकेवर २००१ मध्ये झालेल्या दहशतव–ादी हल्ल्यानंतर अमेरिकेच्या सैन्यदलाने अफगाणिस्तानवर लष्करी कारवाई केली.अफगाणिस्तानातून तालिबानची राजवट संपवून तेथे लोकशाही आणण्यासाठी सुमारे २० वर्षे अमेरिकी सैन्य अफगाणिस्तानात तळ ठोकून होते. परंतु अफगाणिस्तानचे अध्यक्ष अश्रफ घनी यांनी १५ ऑगस्ट २०२१ मध्ये अफगाणिस्तान सोडल्यानंतर ‘तालिबान’ने पुन्हा अफगाणिस्तानमधील सत्ता ताब्यात घेतली.युक्रेन–रशिया युद्धामध्येही, युक्रेनचे अध्यक्ष व्होलोदोमीर झेलेंस्की हेदेखील युक्रेन सोडून पळून जातील, असे ब्लादिमीर पुतीन यांना वाटत होते. तसे काही होण्याची चिन्हे नाहीत. २००० मध्ये नाग–ोर्नो – काराबाख येथे अझरबैजान आणि अर्मेनिया यांच्यात झालेला वांशिक आणि प्रादेशिक संघर्ष, ज्याला ‘ड्रोन युद्ध’ असेही म्हणतात, तो ४४ दिवस सुरू होता. या सर्व युद्धांचे स्वरूप पाहूनच भविष्यातील युद्धे अल्पकालीन असतील, असे निरीक्षकांचे, अभ्यासकांचे मत झाले होते. ते या दोन्ही युद्धांत पूर्णतः चुकीचे ठरले आहे.इतके दिवस युद्धविषयक घडामोडींच्या अभ्यासकांना असे वाटत होते की युद्ध सुरू असलेल्या राष्ट्रांपैकी जे राष्ट्रात तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत आहे ते राष्ट्र कायमच युद्धात वरचढ ठरणार आणि त्यामुळे युद्ध समाप्त होण–ार. परंतु अत्याधुनिक तंत्रज्ञानापेक्षा युद्धतंत्र आणि युद्धाबाबतचे धोरण नीट समजावून घेणे अधिक आवश्यक आहे. कोणत्याही राष्ट्राची संरक्षण आणि परराष्ट्र धोरणाबाबतची उद्दिष्टे अथवा ध्येय स्पष्ट असणे आवश्यक आहे.युक्रेन आणि रशिया दरम्यान सुरू असलेल्या युद्धात तांत्रिकदृष्ट्या विचार करायचा झाल्यास या युद्धात वरचढ ठरण्यासाठी रशियाकडे पुरेसे सामर्थ्य आहे. रशियाने युद्धाची पूर्वतयारीही बऱ्याच आधीपासून सुरू केली होती. परंतु युद्धात आघाडी घेण्याची रम्य स्वप्ने पाहत असताना, ‘नाटो’ सैन्य युद्धात सहभागी झाले नाही तरी त्यांच्याकडून या युद्धात युक्रेनला मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रपुरवठा केला जाऊ शकतो ही शक्यता विचारात घेण्यास रशियाचे नेतृत्व कमी पडले.रशियाने ही चूक आता सुधारल्याचे दिसत आहे आणि हे युद्ध लांबविण्यासही प्रयत्नशील असल्याचे दिसत आहे. रशियाने त्यांची अर्थव्यवस्था टिकवून ठेवण्याचा आणि ऊर्जा वाचवण्याचा बऱ्यापैकी प्रयत्न केला आहे. इतकेच नव्हे तर रशियाकडून त्यांच्या हवाई दलाचाही पूर्ण क्षमतेने वापर केला जात नाहीये. याचे कारण म्हणजे अमेरिका आणि नाटो फौजांनी थेट या युद्धात सहभाग घेऊ नये, याची काळजी रशियाकडून घेतली जात आहे.युक्रेनला आतून खिळखिळे करण्याचे धोरण रशियाने आता स्वीकारल्याचे दिसत आहे. दुसरीकडे इस्त्राईलने मात्र ‘हमास’चा संपूर्ण नायनाट करायचा संकल्प करून सर्व बाजूंनी कारवाई सुरू ठेवण्याचे धोरण आखले असल्याचे स्पष्ट होत आहे.या दोन्ही युद्धातील एक समान दुवा म्हणजे युक्रेन आणि इस्त्राईलला अमेरिकेकडून पाठबळ मिळत आहे. आज मध्य आशियामध्ये जी युद्धाची आग धुमसत आहे त्याला मध्य आशियाबाबतचे अमेरिकेचे धोरण कारणीभूत आहे.

# वाढला कर्जाचा भार

गेल्या काही वर्षांत भारतात पायाभूत सुविधांचा विकास झालेला दिसत असला आणि आर्थिक विकासाबाबत भारताने भरारी घेतलेली असली तरी देशावरील कर्जाचा डोंगर वाढत गेला आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दिलेल्या इशा–यानुसार भारतावर असणारे सध्याचे कर्ज २०२८ पर्यंत जीडीपीच्या शंभर टक्क्यांपेक्षा अधिक राहू शकते. तसेच दीर्घकाळाचा विचार केला तर या कर्जात जोखीम अधिक दिसते. त्यामुळे नाणेनिधीने आर्थिक पोषणासाठी नव्या स्त्रोतांच्या गरजेवर भर दिला आहे.भारताच्या डोक्यावरील कर्जाची स्थिती ही मोठी अर्थव्यवस्था पाहता चिंताजनक नाही. मात्र देशातील अनेक राज्यांच्या कर्जाबाबत असे भाष्य करता येणार नाही. कारण ते मर्यादित महसुलाच्या बळावर आर्थिक स्थिती सांभाळत आहेत. परिणामी त्यांना कर्जफेडीसंदर्भात निर्माण होणा–या समस्यांचा मुकाबला करावा लागत आहे. राज्यांना दरवर्षी कर्ज घेण्यास प्रवृत्त व्हावे लागत आहे आणि त्यामुळे कर्जाचे ओझे वाढतच आहे. भारताने लगेचच कर्जावरून घाबरण्याची गरज नाही. परंतु आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दिलेल्या इशा–यानुसार हे कर्ज २०२८ पर्यंत जीडीपीच्या शंभर टक्क्यांपेक्षा अधिक राहू शकते. ही बाब चिंतेची आहे. नाणेनिधीने म्हटले, दीर्घकाळाचा विचार केला तर या कर्जात जोखीम अधिक दिसते. त्यामुळे नाणेनिधीने आर्थिक पोषणासाठी आणखी नव्या स्त्रोतांच्या गरजेवर भर दिला आहे. विशेष म्हणजे नाणेनिधीचे भारतातील कार्यकारी संचालक के. व्ही. सुब्रह्मण्यम यांच्या माहितीनुसार, सार्वभौम कर्जाची (सॉव्हेरिन लोन) जोखीम खूपच मर्यादित आहे. कारण हे कर्ज प्रामुख्याने देशांतर्गत चलनात दाखविले आहे. गेल्या दोन दशकांपासून जागतिक अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून आर्थिक झटके बसत असतानाही भारताचे सार्वजनिक कर्ज हे जीडीपीच्या प्रमाणात २००५–०६ मध्ये ८१ टक्क्यांवरून २०२१–२२ मध्ये ८४ टक्के झाले. मात्र २०२२–२३ मध्ये हे प्रमाण पुन्हा ८१ टक्क्यांवर आले आहे.नाणेनिधीने २०२३ मध्ये एकूण जागतिक कर्ज हे ९७ खर्व डॉलर राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. भारताने आपल्यावरचे सार्वजनिक कर्ज कमी करण्यासाठी मध्यम कालावधीसाठी योजना राबवून महत्त्वाकांक्षी महसूल गोळा करण्याचा सल्ला दिला आहे. नजिकच्या काळातील संभाव्य एक वेगवान जागतिक मंदी ही व्यापार आणि आर्थिक माध्यमाच्या रूपातून भारतावर परिणाम करू शकते. कालांतराने जागतिक पुरवठा साखळीतील अडथळ्यामुळे आयात वस्तूंच्या मूल्यांत अस्थिरता राहू शकते आणि त्यामुळे भारताच्या गंगाजळीवर दबाव वाढू शकतो. देशांतर्गत विचार केल्यास हवामानबदलाचे झटके हे चलनवाढीचा दबाव वाढवू शकतात आणि पुढे खाद्य नितर्यातीवर बंदी घालण्यास प्रवृत्त करू शकतात. स्थिती चांगली राहिली तर या उलट गरजू ग्राहक हा मागणी आणि खासगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊ शकतो.गेल्या आठवड्यात जगभरातील सरकारांनी घेतलेल्या एकूण सार्वजनिक कर्जाचे प्रमाण २०२३ मध्ये ९७ ट्रिलियन डॉलर असल्याचे नोंदले गेले आहे. २०१९ मध्ये असणा–या एकूण कर्जाच्या तुलनेत हे ४० टक्के अधिक आहे. अमेरिकेच्या डोक्यावरच्या कर्जाचा वाटा हा जगातील एकूण सार्वजनिक कर्जाच्या तुलनेत ३३ टक्के आहे. हे कर्ज अमेरिकेच्या देशांतर्गत सकल राष्ट्रीय उत्पन्न म्हणजेच जीडीपीच्या १२३.३ टक्के आहे. जपानसाठी हे प्रमाण २५५.२ टक्केआहे. जपानचा जागतिक कर्जातला वाटा ११ टक्के आहे. इटलीचे कर्ज जीडीपीच्या १४३.७ टक्के आहे आणि त्यानंतर टक्के, राजस्थान ३६.८ टक्के, केरळ ३६.६ टक्के, आंध्र प्रदेश ३३ टक्के, उत्तर प्रदेश ३२.१ टक्के, मध्य प्रदेश ३०.४ टक्के, तामिळनाडू २५.६ टक्के आणि आसाम २४.४ टक्के आहे. काही लहान राज्यांचे कर्जाचे प्रमाण अधिकच आहे. यात ईशान्येकडील राज्यांचा विचार करता येईल. अरुणाचल प्रदेशात कर्जाचे प्रमाण जीडीपीच्या ५३ टक्के आहे. यापेक्षा अधिक कर्जाचे प्रमाण असणा–या राज्यांत पंजाब, नागालँड, मणिपूर आणि मेघालयचा उल्लेख करता येईल.




फ्रान्स ११० टक्के, कॅनडा १०६.४ टक्के, ब्रिटन १०४ टक्के, ब्राझील ८८.१ टक्के, चीन ८३ टक्के आहे. गेल्या दहा वर्षांत एकूण जागतिक कर्जात १०० ट्रिलियन डॉलरने वाढ झाली आहे. यावरून सरकार, घर आणि खासगी क्षेत्रात कर्जाची मागणी वाढलेली दिसते.भारताचा विचार केला तर कर्जाची स्थिती ही अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून चिंताजनक बाब नाही. परंतु राज्यांचा विचार केला तर त्यांना दरवर्षी कर्ज घेण्यासाठी केंद्राकडे धाव घ्यावी लागत आहे.पंजाबमध्ये २०२३–२४ मध्ये अंदाजित कर्ज हे राज्याच्या जीडीपीच्या तुलनेत ४६.८ टक्के आहे. त्यानंतर बिहार ३७ टक्के, पश्चिम बंगाल ३७.७ राज्य सरकारच्या कर्जात त्यांच्या सर्वंकष कर्जाचा ६५ टक्के वाटा आहे. केंद्रीय आणि राज्य सरकारकडून कर्जाची वाढती मागणी ही विकसनशील संघराज्य अर्थव्यवस्थेत स्वाभाविक आहे. दुर्दैवाने राज्य सरकारवरील कर्जाचा दबाव वाढण्यामागच्या कारणाचा विचार केला तर मोफत योजना आणि अनुदान याचा प्रमुख हिस्सा आहे. दोन्ही केंद्रीय आणि राज्य सरकारे निवडणुका जिंकण्यासाठी डोळे झाकून कमी उत्पन्न गटातील कुटुंबीयांसाठी अनेक मोफत सेवा आणि अनुदान देत आहेत.

# सोन्याचे अर्थकारण चमकणार

राजकीय संकट, जागतिक मंदी या कारणांमुळे नागरिकांचा गुंतवणुकीच्या अन्य पर्यायांवरचा विश्वास काहीसा डळमळीत झाला आहे. त्यामुळे सोन्यात गुंतवणूक केल्यास पैसे सुरक्षित राहतील, ही प्राचीन लोकभावना पुन्हा घट्ट होत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत घट झाल्याने आणि भारतीय अर्थव्यवस्था मजबूत झाल्याने २०२४ मध्ये सोन्यात गुंतवणूक करणा–यांची संख्या वाढू शकते.

रतात सोने हे नेहमीच सुरक्षित आणि फायद्याची गुंतवणूक राहिलेली आहे. संकटाच्या काळात त्याच्या मागणीत आणखीच वाढ होते. कारण सोन्यात गुंतवणूक ही सुरक्षित असण्याबरोबरच चांगला परतावा देणारी देखील आहे. महागाई दर नियंत्रित ठेवण्यासाठी अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडून २०२४ मध्ये व्याजदरात कपात करण्याची आशा, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत घट या कारणांमुळे सोन्याच्या गुंतवणुकीत वाढ होऊ शकते. साधारणपणे जगभरातील सर्व देशांच्या केंद्रीय बँका फेडरल रिझर्व्ह बँकेच्या पावलावर पाऊल टाकतात. त्यामुळे जेव्हा फेडरल रिझर्व्ह बँक व्याजदरात कपात करेल, तेव्हा दुस–या देशांतील केंद्रीय बँका देखील व्याजदरात कपात करतील. त्यामुळे कर्ज आणि ठेवीवरच्या व्याजदरात कपात होईल. ठेवीवरच्या व्याजदरात कपात होईल, तेव्हा चांगल्या परताव्यासाठी नागरिक सोन्याकडे वळतील. आज सोन्याच्या गुंतवणूकदारांना चांगला परतावा मिळत आहे. २०२३ मध्ये सोन्यात गुंतवणूक करणा–यांना १६.४ टक्के दराने परतावा मिळाला आणि तो बँक किंवा अन्य सुरक्षित गुंतवणुकीच्या तुलनेत खूपच चांगला आहे. गेल्या दहा वर्षांत सोन्याने १०५ टक्के परतावा दिला तर जागतिक बाजारात सोन्याची किंमत ही ६३ टक्क्यांनी वाढली. जून २००८ मध्ये दहा ग्रॅम सोन्याची किंमत ही ११,९०१ रुपये होती तर जून २०१४ मध्ये दहा ग्रॅम सोन्याची किंमत २५,९२४ रुपये होती. त्याचवेळी जून २०१७ मध्ये दहा ग्रॅम सोन्याची किंमत २९,४९९ रुपये होती. ऑगस्ट २०२० मध्ये सोन्यात अभूतपूर्व वाढ झाली आणि ही किंमत ५६,४९९ वर पोचली. ऑक्टोबर २०२३ मध्ये ही किंमत ६३,३३२ वर पोचली. त्याचवेळी आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव प्रति औन्स २०५० डॉलर होता. सोन्यात गुंतवणूक करणा–या लोकांत वाढ होत असून ती २०२४ च्या शेवटपर्यंत दहा ग्रॅम सोन्याची किंमत ७० हजार रुपये होण्याची शक्यता आहे. आणि आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव प्रति औन्स २४०० डॉलर होईल. सोन्याच्या किमतीत गेल्या पाच दशकांतील चढ–उतार पाहता अशा प्रकारची स्थिती आगामी पाच–सहा वर्षांतही राहू शकते.



‘बोफा’ नावाच्या जागतिक संशोधन संस्थेनुसार जगभरातील केंद्रीय बँकांनी २०२२ आणि २०२३ मध्ये ब–याच प्रमाणात सोने खरेदी केले. २०२२ मध्ये प्रथमच केंद्रीय बँकांनी १ हजार टनपेक्षा अधिक सोने खरेदी केले. २०२३ मध्येही केंद्रीय बँकांनी १ हजार टनपेक्षा अधिक सोने खरेदी केले असून ते २०२१ च्या तुलनेत अडीच पट अधिक आणि २०२० पेक्षा चार पट अधिक आहे. सध्याच्या काळात जगभरातील सर्व केंद्रीय बँकांच्या राखीव कोट्यात वीस टक्के भागिदारी सोन्याची आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने ९ टन सोन्याची खरेदी केले तर पीपल्स बँक ऑफ चायनाने डिसेंबर २०२३ मध्ये २३ टन सोने खरेदी केले. ऐतिहासिक आकड्यांच्या विश्लेषणाच्या आधारावर २०२४ मध्ये जगभरातील सर्व केंद्रीय बँका आपल्या ठेवीची व्याप्ती वाढविण्यासाठी सोन्याची खरेदी करू शकतात. कोरोना काळ, जागतिक अनिश्चितता आणि जागतिक स्तरावरच्या अर्थव्यवस्थेत राहणारी संवेदनशीलता पाहता अमेरिकेसह अनेक विकसित देशांच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाची गती ही संथ राहिली आहे. त्याचवेळी हमास आणि इस्त्रायल संघर्ष, यामुळे मध्य पूर्व भागात तणावाचे वातावरण आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध दोन वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. परिणामी नागरिक सोन्यात गुंतवणूक करत आहेत.

अर्थात भारत यास अपवाद आहे. कारण या ठिकाणी मंदीतही आणि अर्थव्यवस्था ही चांगली राहत असतानाही सोन्यात गुंतवणुकीचा ट्रेंड राहतो कारण भारतात प्राचीन काळापासून सोन्यात गुंतवणूक करण्याची परंपरा राहिली आहे. भारतात डिसेंबरपासून लग्नांचा हंगाम सुरू झाला आहे आणि सोन्याच्या किमतीत वाढ झालेली असतानाही नागरिक आपल्या आर्थिक स्थितीनुसार कमी– जास्त प्रमाणात सोन्याची खरेदी करत असतात आणि करत आहेत. यातही सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतात सोने हे नेहमीच ‘सोने’ राहिले आहे. कारण भारतातील महिला सोन्याबाबतीत खूपच उत्साही असतात आणि हा अनुभव अनेक काळापासूनचा आहे. प्राचीन काळात तर महिलांसमवेत पुरुषही सोन्याचे दागिने घालत असत. भारताच्या राहणीमानात, सभ्यता आणि संस्कृतीत सोने सामावलेले आहे आणि त्याशिवाय जीवन अपुरे आहे.

भारतीय महिलांसाठी सोने हे केवळ दागिना नसून तिच्यासाठी स्वाभिमान, गौरवाचे प्रतीक आहे. हिंदू धर्माच्या १६ संस्कारांत अर्थात जन्म ते मृत्यूपर्यंत सोन्याला महत्त्व राहिलेले आहे. एवढेच नाही तर हिंदू धर्मातील देव–देवींना देखील सोने अर्पण करणे, सोन्याचे मुकुट घालण्याची परंपरा राहिली आहे. त्यामुळे भारतातील मंदिरात अनेक टन सोने आहे. वर्ल्ड गोल्ड कॉन्सिलने जारी केलेल्या २०२० रोजीच्या अहवालात सुमारे ४ हजार टनपेक्षा अधिक सोने भारतातील मंदिरात असल्याचे म्हटले आहे. भारतात सोन्याची मागणी ही स्थानिक पातळीवर पूर्ण करता येत नसल्याने दुस–या देशांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे भारताने देशांतर्गत सोन्याची मागणी पूर्ण करण्यासाठी २०२२ मध्ये सर्वाधिक सोने चीनमधून आयात केले तर २०२१ मध्ये स्वित्झर्लंडकडून. अर्थात जागतिक अनिश्चिततेमुळे भारतात आर्थिक वर्ष २०२२–२३ मध्ये सोन्याच्या आयातीत २४.१५ टक्के घट झाली आणि ही घट ३५ अब्ज डॉलरवर आली. मात्र ही तात्पुरती स्थिती आहे.

यात बदल झाल्यानंतर भारत पुन्हा सोन्याची आयात करू शकतो.जगभरातील सोन्याच्या आयातीत स्वित्झर्लंडचा वाटा २२.६ टक्केआणि ते मूल्यांच्या आधारावर तो जगातील सर्वांत मोठा आयातदार देश आहे. त्याचवेळी १७.६ टक्के आयात चीनमधून होते अणि हा देश दुस–या स्थानावर आहे. चीन हा जगातील सोन्याच्या एकूण उत्पादनात १०.६ टक्के वाटा उचलतो. आज जगातील सर्वाधिक सोने ८१३३.४७ टन अमेरिकेत आहे आणि याबाबतीत दुस–या स्थानावर राहणा–या जर्मनीत ३३५९.०९ टन सोने आहे. सध्या महागाई अधिक असल्याने आणि शेअर बाजार वगळता बँकिंग आणि अन्य आर्थिक क्षेत्रात ठेवीवरील व्याजदर कमी राहत असल्याने तसेच भू राजनैतिक संकट, जागतिक मंदीची शक्यता या कारणांमुळे नागरिकांचा दुस–या गुंतवणुकीवर विश्वास राहिलेला नाही.

# बौद्धजन सहकारी संघाच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव व स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

मुंबई :– बौद्धजन सहकारी संघ शाखा क्र. ५, मौजे राणवी, गाव व मुंबई शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थी गुणगौरव व शाखेतील बंधू भगिनींच्या स्नेहसंमेलन कार्यक्रम शाखेचे अध्यक्ष संतोष रामचंद्र कदम यांच्या अध्यक्षतेखाली बी. डी. डी. चाळ क्र. ३/४, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, नायगाव, मुंबई येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी संघाचे मुंबई विभाग क्र. १ चे विभाग अधिकारी संतोष कदम यांनी अत्यंत प्रभावी व लाघवी भाषाशैलीत सूत्रसंचालन करून उपस्थितांची मने जिंकून घेतली, सर्वप्रथम स्थानिक कार्यकर्त्यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले तद्नंतर बौद्धचार्य संदीप गमरे यांनी सुमधुर आवाजात धार्मिक विधी पार पाडली. सदर प्रसंगी शालांत परीक्षेत भरगोस गुण मिळवून




उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनी, शासकीय सेवेत व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या शाखेतील व उपस्थित मान्यवरांस पुष्पगुच्छ, शाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमास संघाचे प्रमुख विश्वस्त संजय पवार, न्यायदान कमिटी अध्यक्ष शशिकांत मोहिते, अध्यक्ष राजेंद्र जाधव, संस्कार कमिटी अध्यक्ष संदीप गमरे यांनी उपस्थितांना संबोधित करत मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले तसेच विभाग क्र. ७ चे अध्यक्ष शरद यादव, विभाग अधिकारी सचिन गमरे तसेच राणवी शाखेचे आजी माजी पदाधिकारी, सभासद, कार्यकर्ते, महिला मंडळ, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरतेशेवटी सदर नियोजनबद्ध कार्यक्रम शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे व उपस्थितांचे आभार व्यक्त करून संतोष कदम यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

# विद्यार्थ्यांचे मोबाईल चोरणाऱ्या तीन आरोपींना अटक. वरिष्ठाचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :– विद्यार्थ्यांचे मोबाईल चोरणाऱ्या तीन आरोपींना अटक. वरिष्ठाचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

याबाबत थोडक्यात माहिती की, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीमधून परीक्षा हॉल बाहेर बॅग ठेवून परीक्षेसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांचे मोबाईल बॅगसह चोरून नेल्याची घटना घडली होती. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हे दाखल झाले होते. तसेच इतर पोलीस स्टेशनला देखील मोबाईल चोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले होते.

सदरचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आदेशित केले होते. त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या होत्या. सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना मोठ्या प्रमाणात बातमीदार नेमून तसेच तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेण्यात येत होते.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी केलेल्या परिश्रमामुळे पथकांना गुप्त बातमीदाराकडून मोबाईल चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली.

सदर माहितीची बारकाईने अभ्यास व विश्लेषण करून मोबाईल चोरी करणारे व ते मोबाईल कमी किमतीत लोकांना विकणाऱ्या आरोपींची टोळी निष्पन्न करून टोळी टोळीतील सदस्यांना त्यांच्या राहते ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर पथकांनी अतिशय कुशलतेने व उत्कृष्टपणे नमूद गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन खालील आरोपींना मोबाईल व विद्यार्थ्यांच्या ब्यागसह ताब्यात घेण्यात आले.

१) ऋषिकेश उर्फ भुऱ्या सुरेश कुरे, वय १९ वर्ष राहणार रेणापूर सध्या राहणार राजे शिवाजीनगर, पाखर सांगवी लातूर.
२) दिनेश दयानंद पवार वय १९, वर्ष,



राहणार हरंगुळ बुद्रुक सध्या राहणार महिंद्रा शोरूम च्या पाठीमागे बार्शी रोड लातूर.
३) सोमेश राम हिप्परगे, वय १९ वर्ष, राहणार मुरुड सध्या राहणार विक्रम नगर, पाण्याच्या पाठीमागे लातूर.

यांना दिनांक १५/०१/२०२४ रोजी आरोपींना त्यांचे राहते ठिकाणाहून ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबुल केले.त्यांनी वर नमुद गुन्ह्यात चोरलेला मुद्देमाल विविध कंपनीचे २० मोबाईल एकूण १ लाख ५९ हजार रुपयाचा मुद्देमाल व तीन बॅग हजर केल्याने वरील आरोपींना वर नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे मोबाईल चोरीचे २ गुन्हे उघड झाले असून मोबाईल चोरीचे आणखीन गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे

गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे एमआयडीसी करीत आहेत.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस पथकांनी अतिशय उत्कृष्टरित्या तपास करून मोबाईल चोरणाऱ्या आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अमलदार नवनाथ हासबे, माधव बिल्लापट्टे राजेश कंचे, राजू मस्के, तुराब पठाण प्रदीप स्वामी, जमीर शेख, नकुल पाटील यांनी केली आहे.

# जिज्ञासा स्पोर्ट्स क्लब चषक २०२४ च्या विजेता पदाचा मान कालभैरव झोम्बडी संघाने पटकावला

मुंढर :– बौद्धजन सहकारी संघ शाखा क्र. २४ मौजे मुंढर गाव व मुंबई तसेच रमाई महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जिज्ञासा स्पोर्ट्स क्लब चषक २०२४ आयोजन दि. १२ जानेवारी ते १४ जानेवारी या कालावधीत मुंढर बौद्धवाडी, हनुमान मंदिरासमोरील पटांगणात करण्यात आले होते. सदर क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन गिमवी विभाग क्र. ३ चे अध्यक्ष राजेश मोहिते (झोम्बडी) यांच्या शुभहस्ते करण्यात आले, बौद्धजन सहकारी संघ गुहागर तालुका अध्यक्ष व स्वतंत्र सैनिक सुनील जाधव (जानावळे), मुंढर गावचे पोलीस पाटील व गिमवी विभाग क्र. ३ चे सचिव निलेश लक्ष्मण गमरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तसेच ग्रामपंचायत सदस्या मनीषा गमरे, न्यू इंग्लिश स्कुल तळवली शाळेचे सेवानिवृत्त प्रिन्सिपल प्रकाश अनंत शिर्के, एकनाथ शिर्के आदी मान्यवर ही उपस्थित होते. सदर जिज्ञासा स्पोर्ट्स क्लब चषक २०२४ च्या पंच



पदाची जबाबदारी बंडू मोहिते, कैलास पिलंकर व समित पवार यांनी निःपक्षपातीपणे पार पाडली तसेच आपल्या खास शैलीत लक्षवेधी समालोचन करून समालोचक नरेश पवार यांनी प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. सदर स्पर्धेत प्रथम क्रमांक कालभैरव झोम्बडी संघाने पटकावला तर खछा फायटर्स जानावळे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला, उत्कृष्ट फलंदाज भाईजान (जानावळे), उत्कृष्ट गोलंदाज आर्यन (झोम्बडी संघ), उत्कृष्ट क्षेत्ररक्षण शुभम गुरव, अंतिम सामना सामनावीर मुकुंद पेजले, मालिका वीर झोम्बडी संघ कर्णधार अवधूत सकपाळ हे ठरले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बौद्धजन सहकारी संघ, ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी, शाखा क्र. २४ मौजे मुंढर गावचे आजी माजी कार्यकारिणी मंडळ, सल्लागार, महिला मंडळ, सभासद, मुंबई शाखेचे प्रमुख कार्यकर्ते, सल्लागार, सभासद, विद्यार्थी विद्या विकास मंडळ, कन्या मंडळ, रमाई महिला मंडळ व मंडळाच्या आजी माजी कार्यकर्ता, हितचिंतक या सर्वांनी अथक परिश्रम घेतले व सहकार्य केले त्याबद्दल त्यासर्वांचे तसेच सदर कार्यक्रमासाठी धम्मदान करून हातभार लावणाऱ्या सर्व देणगीदारांचे भूषण पवार यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# कर वसुलीसाठी मनपाची जप्ती मोहीम नागरिकांनी कर भरण्याचे पालिकेचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी : – शहरातील मालमत्ता धारकांकडे थकीत असणारा कर वसूल करण्यासाठी वारंवार नोटिसा देऊनही कर भरणा केला जात नसल्याने पालिकेने आता जप्ती मोहीम सुरू केली आहे.नागरिकांनी जप्ती टाळण्यासाठी कर भरणा करण्याचे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



कर भरणा करण्यासाठी मनपाच्या वतीने आतापर्यंत मालमत्ता धारकांना सूचना देण्यात आल्या.अनेक नोटीसाही पाठवण्यात आल्या. तरीही कराचा भरणा केला जात नसल्याने पालिकेने ही मोहीम हाती घेतली आहे.

या अंतर्गत मंगळवारी (दि.१६ जानेवारी) कांही मालमत्तांची जप्ती करण्यात आली.क्षेत्रीय कार्यालय अ अंतर्गत बार्शी रस्त्यावरील एव्हरग्रीन नर्सरी या मालमत्ता धारकाकडे एकूण २ लाख ८१ हजार ५३० रुपये कराची थकबाकी होती. तो न भरल्यामुळे मनपा आयुक्तांच्या आदेशावरून नर्सरी सील करण्यात आली.या कारवाईत क्षेत्रीय अधिकारी कलीम शेख, कर निरीक्षक प्रदीप जोगदंड,वसुली लिपिक विकी खंदारे,अमोल गायकवाड,सुशील ताटे, युनूस पठाण,विलास मगर यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

डी झोन मध्येही अशीच कारवाई करण्यात आली. एका मालमत्ताधारकाने २ लाख ९७ हजार ४० रुपयांचा कर थकवाल्यामुळे त्यांच्या मालमत्तेत असणारे बँकेचे एटीएम व दुकान सील करण्यात आले.या कारवाईत झोन डी चे क्षेत्रीय अधिकारी बंडू किसवे,कर निरीक्षक तहेमुद शेख,वसुली लिपिक भालचंद्र कांबळे, दत्ता गंगथडे,गोविंद रोंगे, देवेंद्र कांबळे व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

क्षेत्रीय कार्यालय बी मध्ये मालमत्ताधारकाने थकीत ३लाख ३६ हजार ३८२ रुपयांचा धनादेश मनपाच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला.

मनपाने थकीत कर भरणा करण्यासाठी आतापर्यंत अनेक सवलती,योजना जाहीर केल्या होत्या.तरीदेखील अनेकांनी कराचा भरणा केला नाही.त्यामुळे पालिकेने आता जप्ती मोहीम सुरू केली आहे.ही कारवाई टाळण्यासाठी करदात्यांनी मनपाकडे आपल्या कराचा भरणा लवकरात लवकर करावा,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेसाठी ३१ जानेवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि. १६ (जिमाका): इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या १३ डिसेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाने भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाज बांधवासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना सुरु केलेली आहे.या योजनेंतर्गत राज्यातील धनगर समाजातील वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी २५ हजार उद्दिष्ट निश्चित केलेले आहे. लातूर जिल्ह्यातील धनगर समातातील पात्र लाभार्थ्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी आपले अर्ज संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्यामार्फत ३१ जानेवारी, २०२४ पर्यंत सादर करण्याचे असे अवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक यांनी केले आहे.

## यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत वैयक्तिक घरकुल योजनेसाठी ३१ जानेवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि. १६ (जिमाका): विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाच्या २४ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाने विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत वैयक्तिक घरकुल योजना सुरु केली आहे.या योजनेंतर्गत लातूर जिल्ह्यात विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत वैयक्तिक घरकुल योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी आपले अर्ज संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्यामार्फत ३१ जानेवारी, २०२४ पर्यंत सादर करण्याचे असे अवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक यांनी केले आहे.

# युवा हृदयसम्राट सुजात (दादा) प्रकाश आंबेडकर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा






नवी मुंबई / के. एच. हनवते :– (तुर्भे) नवी मुंबई वंचित बहुजन आघाडी नोटीस बोर्ड येथे साजरा करण्यात आला व सर्व उपस्थितांना लाडू वाटप करून धम्मदीप बुद्ध विहारांमध्ये केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्षा शिल्पाताई रणदिवे, साक्षीताई लोटे महिला जिल्हा महासचिव, लाटे मॅडम जिल्हा उपाध्यक्ष महिला भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा संघटक आयोध्या ताई काशीद, गौतम चव्हाण मा. जिल्हा उपाध्यक्ष, चंद्रकांत ताकपीरे, दिलीप बळसाने, विष्णू वासमनी, जिल्हा सचिव बाबासाहेब मेहते, जिल्हा सचिव महादेव निसर्गन तुर्भे विभाग प्रमुख, व भारतीय बौद्ध महासभा शाखा हनुमान नगर शाखा अध्यक्षा सुनंदाताई वाघमारे, व पूर्ण भारतीय बौद्ध महासभा वंचित बहुजन आघाडी तुर्भे विभाग व शाखा : पदाधिकारी अरविंद गायकवाड तुर्भे विभाग सचिव, वंचित बहुजन आघाडी वार्ड अध्यक्षा ज्योतीताई सरवदे, सुवर्णाताई रणदिवे वार्ड पदाधिकारी, वार्ड अध्यक्ष सिद्धार्थ साळवे, वार्ड उपाध्यक्ष तुषार शरणागत, वार्ड सचिव विशाल गवळी, वार्ड पदाधिकारी चैतन्य बनसोडे, कार्याध्यक्ष सागर घाडगे, वार्ड शिवसरण गवळी, वार्ड संघटक प्रमुख राजेंद्र सोनवणे, वार्ड सदस्य विश्वदीप सूर्यवंशी, वार्ड सदस्य मुकेश शरणागत व आजी–माजी पदाधिकारी व महिला व स्थानिक रहिवासी यांच्या उपस्थितीमध्ये साजरा करण्यात आला. आयोजक : वंचित बहुजन आघाडी तुर्भे विभाग, वंचित बहुजन आघाडी शाखा हनुमान नगर, भारतीय बौद्ध महासभा शाखा हनुमान नगर, या सर्वांच्या उपस्थितीत सुजात (दादा) आंबेडकर यांचा वाढदिवस जल्लोषामध्ये साजरा करण्यात आला. उपस्थित सर्वांचे मनापासून जाहीर आभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न केला.

# जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांसाठी अर्ज करावेत

लातूर, दि. १६ (जिमाका) : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाकडे जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ आणि संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ या दोन महामंडळाचे कामकाज सोपविण्यात आले आहे. या दोन्ही महामंडळाचे कामकाज सुरु झाले असून राज्यातील गुरव समाज व लिंगायत समाजातील घटकांसाठी व्यापार, उद्योग, शेतीपूरक व्यवसाय तसेच व्यावसायिक व उच्च शिक्षणासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भाव येथील महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती खालीलप्रमाणे आहे.ऑनलाईन कर्ज योजना राष्ट्रीयकृत, नागरी, सहकारी, शेडयुल्ड तथा मल्टीशेड्युल्ड बँकाकडून घेतलेल्या कर्जाच्या दरमहा नियमित परतफेड केलेल्या हप्त्यावरील १२ टक्केपर्यंत व्याजाच्या व ५ वर्षेपर्यंतच्या मुदती कर्जावरील व्याज रकमेचा परतावा लाभार्थीस ऑनलाईन पध्दतीने बचत खात्यात महामंडळातर्फे जमा करण्यात येतो. तथापि, लाभार्थीने बँकेकडे कर्जासाठी अर्ज करण्यापूर्वी महामंडळाचे एलओआय (पात्रता प्रमाणपत्र) प्रथम घेणे अनिवार्य आहे. ऑनलाईन कर्ज योजनांसाठी महामंडळाच्या संकेतस्थळावर अर्ज करावा.१) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा – व्यापार, उद्योग, सेवा व शेतीपूरक व्यवसायासाठी लागणाऱ्या कर्जासाठी – कर्ज मर्यादा १० लक्ष रुपये.– अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लक्ष रुपयेपर्यंत असावे.२) गट कर्ज व्याज परतावा योजना – बचत गट, भागीदारी संस्था (निबंधक मुंबई प्राधिकृत), सहकारी संस्था (जिल्हा उपनिबंधक प्राधिकृत) इ.– कर्ज मर्यादा १० ते ५० लक्ष रुपये.– गटातील सभासदांची वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लक्ष रुपयेपर्यंत.३) शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना – पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी – देशांतर्गत शिक्षणासाठी १० लक्ष रुपये. – परदेशी शिक्षणासाठी २० लक्ष रुपये.– अभ्यासक्रम : आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवसायीक व व्यवस्थापन, कृषी, अन्नप्रकिया व पशु विज्ञान – अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा ८ लक्ष रुपयेपर्यंत. ४) महिला स्वंयसिध्दी कर्ज व्याज परतावा योजना – महिला बचत गटासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लोकसंचालित साधनकेंद्राच्या साहयाने राबविण्यात येईल – प्रथम टप्यात ५ लक्ष कर्ज घेण्यास मान्यता व सदर कर्ज परतफेडीनंतर द्वितीय टप्यात १० लक्ष रुपये कर्ज घेण्यास पात्र. ऑफलाईन कर्ज योजना

१) थेट कर्ज योजना – महामंडळामार्फत १ लक्ष रुपयेपर्यंत थेट कर्ज – नियमित कर्ज परतफेडीवर व्याज आकारले जाणार नाही, तथापि थकीत कर्ज रकमेवर ४ टक्के व्याज आकारले जाईल. – कर्ज परतफेड कालावधी ४ वर्ष (रु. २०८५ मासिक हप्ता ) – अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न मर्यादा १ लक्ष रुपयेपर्यंत. २) बीजभांडवल कर्ज योजना – राष्ट्रीयकृत व जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत राबविण्यात येते.– कर्ज मर्यादा ५ लक्ष रुपयेपर्यंत. – बँक मंजुर कर्ज रकमेत महामंडळ सहभाग २० टक्के, बँकेचा सहभाग ७५ टक्के व लाभार्थी सहभाग ५ टक्के. – व्याज दर महामंडळ सहभागावर ६ टक्के, बँकेच्या सहभागावर प्रचलित बँक व्याज दरानुसार.– अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा १ लक्ष रुपयेपर्यंत. पात्रतेचे निकष– लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा – तो महामंडळाचा, बँकेचा अथवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा – कुंटुंबातील एकाच व्यक्तीस योजनेचा लाभ घेता येईल – वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे. – अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्याचे त्याला ज्ञान किंवा अनुभव असावा – कर्जाच्या अटी व शर्ती महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे राहतील. – सर्व व्याज परतावा योजनांसाठी लाभार्थीने कर्ज मंजुरीसाठी बँकेकडे जाण्यापूर्वी महामंडळाचे एलओआय (पात्रता प्रमाणपत्र) घेणे अनिवार्य आहे. लातूर जिल्ह्यातील गुरव व लिंगायत समाजातील बांधवांनी योजनांच्या अधिक माहितीसाठी व ऑफलाईन कर्ज योजनांच्या अर्जासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, पहिला मजला, जात पडताळणी इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवनेरी गेट समोर, गुळ मार्केट, लातूर (दुरध्वनी क्र. ०२४८२–२५३३३४) येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय महामार्गाच्या नावाखाली वृक्षतोड; कधी होणार वृक्षलागवड

किनवट / ता.प्र .शेख शौकत :– किनवट ते नांदेड जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग रुंदीकरण करण्यासाठी सदर रस्त्यांच्या लगत असलेल्या अनेक वर्षांपासून रखरखत्या उन्हात सावली देणाऱ्या जुन्या आणि डेरेदार वृक्षांवर यांत्रिक कटर चालवून झाडे जमीनदोस्त करण्यात आल्याने वृक्षप्रेमींकडून संताप व्यक्त केला जात आहे. मोठ्या झाडांच्या कत्तली करुन मोठ्या प्रमाणावर पाच ते सहा वर्षांपासून वृक्षतोड करण्यात येत आहे. राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण च्या हरित राजमार्ग विभाग अंतर्गत रस्त्याच्या दोन्ही बाजूस झाडे लावण्याचा नियम असून त्यास वेगळ्या निधीची तरतूद असते. परंतु अद्यापही कुठेच वृक्ष लागवडीचे काम चालू नसून शासनच झाडे लावा, झाडे जगवाचा फतवा नावालाच घेऊन मिरवत आहेत.



राष्ट्रीय राजमार्ग लगत असलेली झाडे स्थलांतरित का केली नाही? वृक्षतोड कोणत्या नियमांतर्गत केले? वृक्षतोड केलेले झाडाची भरपाई म्हणून काय उपाय योजना आहेत? इकोझोन ग्रीन झोन च्या नावाखाली रस्त्याचे रुंदी करून थांबवले मग वृक्ष तोड का? १९९२ क्युटो प्रोटोकॉलच्या नियमांतर्गत कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करण्याचे जागतिक स्तरावर नियम असताना आपल्या ग्रीन झोनची वृक्षतोड का? वृक्षतोड झालेल्या वृक्षाचा महसूल कुठे गायब झाला? असे अनेक प्रश्ननिर्माण निर्माण झाले आहेत. शासकीय कामावरच वृक्ष लागवडीची होत असलेली परवड कधी थांबणार हा मागणी तथा पर्यावरण प्रेमी आम जनतेने केला आहे. किनवट ते नांदेड जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग रस्त्याच्या कामाचे ठेकेदार हे वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे असून या रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या नावाखाली रस्त्यालगत असलेल्या विविध प्रकारच्या छोट्या मोठ्या झाडांचा अडथळा दाखवत शेकडो झाडांवर वृक्षांवर यांत्रिक कटर चालवून झाडे जमीनदोस्त करण्यात येऊन अमानुषपणे वृक्षतोड केली गेली. त्यावेळी तोडलेली झाडे नेमकी गेली कुठं, कोणाच्या घशात भरली त्यापासून आलेला पैसा कुठे वापरला याचा थांगपत्ता त्या त्या गुत्तेदार आणि त्या त्या अधिकाऱ्यांनाच माहीत. पण त्यावेळी वृक्षतोड तोड होत असताना वृक्षप्रेमींनी जाब ही विचारला होता परंतु तेंव्हा असे सांगण्यात आले होते की रस्त्याचे रुंदीकरण होताच रस्त्याच्या दोन्ही बाजूने नव्याने वृक्षलागवड करण्यात येणार आहे. रोडचे काम होऊन सुद्धा अद्याप वृक्ष लागवड करण्यात आलेली नाही मग कुठं पाणी मुरतंय हे कळायला मार्ग नाही. दरवर्षी सरकार वृक्ष लागवडीच्या नावावर कोट्यवधी रुपयांचा चुराडा करत शासकीय कागदोपत्री आदेश आणि केवळ जाहिरातबाजी करत झाडे लावा, झाडे जगवाचा फतवा मिरवत आहे. एवढेच नाही तर वेगवेगळ्या कार्यक्रमातून, अभियानातून वृक्ष लागवड साठी जनमानसाला जागृत करत आहे. तर मग अशा शासकीय कामावरच असे घडत असलेले प्रकार पाहता दिव्याखालीच अंधार असेच म्हणावे का आओ चोरो बांधो भारा, अधा तुम्हारा आधा हमारा अशीच काहीशी परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते. लवकरात लवकर राजमार्गालगत वृक्ष लागवड करून झालेल्या वृक्षतोडीची भरपाई करावी अशी मागणी निसर्गप्रेमी आम नागरिकांनी केली आहे.

## रेणापूर पोलिस स्टेशन समोर मृतांच्या नातेवाईकांचे ठिय्या आंदोलन पोलिसाची आरोपी वर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ

लातूर / प्रतिनिधी :– रेणापुर तालुक्यातील कामखेडा येथील अभय अनुरथ सुर्यवंशी रा.कामखेडा या तरूणांचा मृतदेह विहिरीत आढळून आला होता.अभय अनुरथ सुर्यवंशी यांचा खून झाला आहे संबंधित आरोपीवर खुनाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्यात यावी यासाठी वडील चुलते व इतर नातेवाईक यांनी पोलिस स्टेशन समोर ठिय्या आंदोलन केले. अभय अनुरथ सुर्यवंशी यांचा मृतदेह विहिरीत आढळून आला होता.त्याचा घातपात झाला आहे संबंधितावर गुन्हा दाखल करावा रेणापूर पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक अनंत्रे टाळाटाळ करत आहेत.त्यांच्याकडे अनेक वेळा




जाऊन सुद्धा गुन्हा दाखल केला नाही.नातेवाईक यांनी रेणापूर पोलिस स्टेशन, उपविभागीय पोलिस अधिकारी चाकुर, पोलिस अधीक्षक लातूर यांच्या कडे देऊन परत अधीक्षक यांनी सांगुन सुद्धा पोलिस निरीक्षक गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करत आहेत .तेथील ठाणे अंमलदार यांनी अर्ज आपण वरीष्ठ कडे द्या उपविभागीय पोलिस अधिकारी चाकुर पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्या कडे द्या आम्ही घेणार नाही पोच देणार नाही असे आम्हाला साहेबांनी सांगितले आहे असे म्हणतातच नातेवाईक यांचा राग अनावर झाला व पोलिस स्टेशन समोर ठिय्या आंदोलन केले.पोलीस निरीक्षक व ठाणे अंमलदार यांना निलंबित करण्यात यावे संबंधीत आरोपीवर गुन्हा दाखल तात्काळ अटक करण्यात यावी यासाठी १६ जानेवारी रोजी पोलिस स्टेशन रेणापूर समोर बेमुदत उपोषणाला बसणार आहेत असा इशाराही देण्यात आला.

## उल्हासनगर महापालिकेच्या वतीने राज्य क्रीडा दिन साजरा

उल्हासनगर : उल्हासनगर महापालिका क्रीडा विभागाच्या वतीने काल आयुक्त तथा प्रशासक, श्री. अजिज शेख, यांच्या मार्गदर्शनाखाली व श्रीम. प्रियंका राजपूत, उपायुक्त (क्रीडा) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात आला असून यावेळी विविध स्पर्धाचे व रॅलीचे आयोजन करुन क्रीडा शिक्षकांचा सत्कार करण्यात आला आहे . हा समारंभ मिडटाऊन हॉल, गोल मैदान, उल्हासनगर १ या ठिकाणी संपन्न झाला . उल्हासनगर महापालिकेच्या क्रीडा विभागाच्या वतीने क्रीडा दिन साजरा करण्यात आला असुन या कार्यक्रमात ऑलिंम्पिकवीर स्वर्गीय खाशाबा जाधव यांच्यावर व्याख्यान होवून ट्रॉफी, आणि बक्षिस वाटप करण्यात आले आहे . यावेळी सर्व क्रीडा शिक्षकांना सन्मानचिन्हे देवून गौरविण्यात आले, तर रॅलीत सहभागी झालेल्या शाळांना सन्मानचिन्हे देवून त्यांचा सत्कार करण्यात आला . क्रीडा विभागाने क्रीडा शिक्षकांसाठी राष्ट्रीय खेळाडू तसेच राष्ट्रीय कोच श्री. प्रेमचंद अकोले, यांना या ठिकाणी उपलब्ध करुन त्यांनी कुस्ती बाबतचे काही महत्वाचे डावपेच व विरोधी डावपेच यांचे प्रात्याक्षिके दाखवुन चांगले मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाला उल्हासनगर महापालिकेतील श्रीम. प्रियंका राजपूत, उपायुक्त (क्रीडा ), डॉ. सुभाष जाधव, उपायुक्त (आरोग्य), क्रीडा अधिकारी श्री. शांताराम चौधरी, श्रीम, छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी, श्री. राजा बुलानी, विधी विभाग प्रमुख, श्री. राजेश घनघाव, विभागप्रमुख (दि.क.यो.वि.) श्री. अनिल खतुरानी, सहा. आयुक्त, श्री. मनोज जाधव, विभाग प्रमुख स्थानिक संस्था करविभाग, प्रेमचंद अकोले, व सर्व क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

## उल्हासनगर येथील नगरभुमापन कार्यालयातील अभिलेखा कक्षात खाजगी व्यक्तीचा वावर, अभिलेखपाल अनिल माने यांना कारणे दाखवा नोटिस..

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर कँप ५ येथील नगर भूमापन अधिकारी यांच्या कार्यालया बाहेर काल प्रहार जनशक्ति पक्ष व राष्ट्र कल्याण पार्टी यांच्या मार्फत विविध मागण्या घेऊन आंदोलन सुरु होते. त्याच दरम्यान अभिलेखा कक्षात अनधिकृतपणे खाजगी व्यक्तीने प्रवेश करुन तो फाईल हाताळत असल्याचे नगरभुमापन अधिकारी यांच्या निदर्शनास या आंदोलनकर्त्यानी आणुन दिले असता, अभिलेखापाल अनिल माने यांना वरिष्ठानी कारणे दाखवा नोटीस बजावल्याने सदर कार्यालयात खळबळ उडाली आहे. दरम्यान या बाबत प्रहार जनशक्ती पक्षातर्फे ड . स्वप्निल पाटिल व राष्ट्र कल्याण पार्टी तर्फे शैलेश तिवारी सोबतच इतर पदाधिकाऱ्यानी तीव्र हरकत घेतलेली असून संबंधीतांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केले आहे. उल्हासनगर कँप ५ येथील नगरभुमापन कार्यालयात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळला आहे. गोर गरीबांचे कामे होत नाहीत तर भुमाफिया यांची कामे ताबडतोब होतात . त्यामुळे काल या कार्यालया बाहेर प्रहार जनशक्ती पक्ष व राष्ट्र कल्याण पार्टी यांच्या सयुक्त विद्यमाने आंदोलन करण्यात आले. तेव्हा आंदोलकांशी चर्चा करताना अभिलेख कक्षामध्ये खाजगी व्यक्ती जात असल्याचा व्हिडियो आंदोलनकर्त्यानी अधिकाऱ्याना दाखवला . यावरुन कार्यालयाच्या अभिलेखा कक्षात खाजगी व्यक्तीने प्रवेश केल्याचे सकृत दर्शनी दिसून येत असताना अधिकाऱ्यानी सावरा सावर करण्याचा प्रयत्न केला . दरम्यान या बाबत आपण आपला खुलासा सत्वर या कार्यालयात सादर करावा व अभिलेखा कक्षात अनधिकृतपणे केलेल्या प्रवेशाबद्दल पोलीस विभागाशी संपर्क साधून ३ दिवसांत उचित कारवाई करण्याची दक्षता घ्यावी. जर तीन दिवसांत संबंधीत विषयांत गुन्हा दाखल न झाल्यास नगरभूमापन कार्यालय ठाणे येथे तीव्र आंदोलन केले जाईल अश्या प्रकारची कारणे दाखवा नोटिस अभिलेखपाल अनिल माने यांना नगर भूमापन अधिकारी उन्हासनगर श्री राजेंद्र लोंढे यांच्या मार्फत देण्यात आली आहे .

## . बाबासाहेब आंबेडकर टीचर्स असोसिएशनचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

भाईंदर : मिरा भाईंदर मध्ये कार्यरत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर टीचर्स असोसिएशनच्या वतीने या संस्थेचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी उठाव साहित्य मंचचे अध्यक्ष विवेक मोरे आणि गझलकार गजानन गावंडे यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. कवी विवेक मोरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठासाठी झालेल्या नामांतर संघर्षाचा संदर्भ देत आंबेडकरी कवितांचे उठावदार सादरीकरण केले तर गझलकार गजानन गावंडे यांनी आपल्या गझल गायकीतून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर टीचर्स असोसिएशनमधील ज्या सभासदांनी शैक्षणिकदृष्ट्या गुणवत्ता प्राप्त केली त्यांचे सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. मीरा भाईंदर मधील गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर टीचर्स असोसिएशनच्या वतीने शिष्यवृत्ती देण्यात आली. यावेळी गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना मदत करणाऱ्या दात्यांचाही गौरव करण्यात आला. असोशिएशनने ज्या विद्यार्थ्यांना याआधी मदत केली आणि आता जे अतिशय चांगल्या हुद्द्यावर आहेत त्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला वंदनीय भंते बोधिरत्न यांनी उपस्थितांना पंचशील त्रिशरण दिले. प्राचार्य रमेश वाघमारे यांनी क्रांतीगीत सादर करून श्रोत्यांना उत्साहीत केले. प्रा. सुनील धापसे यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून असोशियेशन करत असलेल्या कार्याचा आढावा घेतला आणि असोसिएशनची पुढील दिशा सर्व सभासदांना समजावून सांगितली. प्राचार्य सिद्धार्थ इंगळे अध्यक्ष असलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उत्तम भगत यांनी केले तर प्रा. सुरेश खुणे यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमाला बाटा सभासदांसह मीरा भाईंदर मधील विविध संस्था संघटनांचे प्रतिनिधी यांची विशेष उपस्थिती लाभली.

# 'महात्मा बसवेश्वर' मध्ये मकरसंक्रांत निमित्त पारंपरिक वेशभूषा स्पर्धा संपन्न

लातूर :– येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात खट–उ, युवती मंच, सांस्कृतिक विभाग आणि विद्यार्थी परिषदेच्या संयुक्त विद्यमाने मकर संक्रांतीचे औचित्य साधून ट्रॅडिशनल डे साजरा करण्यात आला. यावेळी पारंपरिक वेशभूषा स्पर्धा संपन्न झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपीठावर वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्रचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, खट–उ समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, विद्यार्थी परिषदेचे प्रमुख डॉ. बाळासाहेब गोडबोले, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, युती मंचाच्या डॉ. शितल येरुळे आणि प्रा. वनिता पाटील, संगीत विभागाचे प्रमुख प्रा. विजयकुमार धायगुडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले.



कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्या ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती याकरिता परीक्षक म्हणून प्रा. विश्वनाथ स्वामी, डॉ. जितेंद्र देशमुख, डॉ. राहुल डोंबे आणि प्रा. शिवगंगा तुपकरी काम पहिले. कनिष्ठ विभाग सर्वप्रथम कु. मनस्वी बावस्कर, बारावी कला सर्व द्वितीय कु. कांबळे सायली, बारावी कला सर्व द्वितीय क्रमांक विभागून कु. आरती वाघमारे, बारावी विज्ञान सर्व तृतीय क्रमांक ओंकार लोंढे, बारावी वाणिज्य श्रेया शिरसाठ, बारावी विज्ञान विभागून सर्व तृतीय तर वरिष्ठ महाविद्यालयातील निकाल सर्वप्रथम कु. माधुरी भातलवंडे, बीएससी प्रथम, सर्व द्वितीय विभागून कु. रोहिणी बाचके, बी कॉम द्वितीय वर्ष, कु. मीनाक्षी ठाकरे, एम ए प्रथम वर्ष, सर्व तृतीय विभागून कु. स्वामी सायली, बीकॉम प्रथम वर्ष, कु. मानसी बनशेट्टी, बीए द्वितीय वर्ष. या विजेत्या सर्व स्पर्धकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच भूगोल दिन आणि मकर संक्रांतीचे औचित्य साधून प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई , उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनीही मकर संक्रांतीचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वनिता पाटील यांनी केले तर आभार डॉ. रत्नाकर बेडगे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे, बालाजी डावकरे, आनंद खोपे, सय्यद जलील, अशोक शिंदे, सोनाली लोंढे आणि भीमाशंकर सुगरे आदींनी परिश्रम घेतले.

## मोदी आवास घरकुल योजनेसाठी ३१ जानेवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि. १६ (जिमाका): इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या २८ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाने इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी मोदी आवास घरकुल योजना सुरु केलेली आहे. या योजनेंतर्गत राज्यात तीन वर्षात १० लाख घरे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे.इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील आवास प्लस मधील प्रतिक्षा यादीत नाव असलेल्या तथा आवास प्लस प्रणालीवर नोंद झालेले परंतु स्वयंचलित प्रणालीद्वारे अपात्र झालेल्या पात्र लाभार्थ्यांनी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा यांनी निश्चित केलेल्या उद्दिष्टानुसार लातूर जिल्ह्यातील इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांनी मोदी आवास घरकुल योजनेचा लाभ घेवू इच्छिनाऱ्या जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी आपले अर्ज संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्यामार्फत ३१ जानेवारी, २०२४ पर्यंत सादर करण्याचे असे अवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक यांनी केले आहे.

## लातूर येथे सैनिकी मुलींच्या वसतिगृहासाठी अशासकीय सहायक अधीक्षिका पदाची होणार भरती

लातूर, दि. १६ (जिमाका): जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या आस्थापनेवरील लातूर येथील सैनिकी मुलींचे वसतिगृहासाठी अशासकीय सहायक अधीक्षिका पद तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधन प्रतिमाह २३ हजार २८३ प्रमाणे भरण्यात येणार आहे. या पदासाठी इच्छुक माजी सैनिक पत्नी अथवा विधवा, सेवारत सैनिकांच्या पत्नी यांनी २९ जानेवारी २०२४ रोजी स्वतः अर्ज व मूळ कागदपत्रांसह जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सैनिक संकुल, एम.आय.टी. मेडिकल कॉलेज समोर, अंबाजोगाई रोड, लातूर येथे उपस्थित राहावे. निवड करण्यात आलेल्या उमेदवारास तात्काळ कामावर घेण्यात येणार असल्याचे लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) शरद पांढरे यांनी कळविले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE